# भूगोल

## उत्तरे : सराव प्रश्नपत्रिका 3 री

**प्र. 1.**

(1) भारतातील राजस्थान या राज्यात पर्जन्याचे प्रमाण कमी आहे.

(2) भारत व ब्राझील या दोन्ही देशांतील राजवट प्रजासत्ताक प्रकारची आहे.

(3) मनोरंजन हा क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश नाही.

(4) जगाच्या लोकसंख्येपैकी २.७८ टक्के लोकसंख्या ब्राझील देशात आहे.

**प्र. 2.**

(1) अरुणाचल प्रदेशाशेजारील देश – अफगाणिस्तान.

(2) मौसिनराम – सरासरी वार्षिक पर्जन्यमान ५०० मिमीपेक्षा कमी.

(3) बिहार – विरळ लोकसंख्येची घनता.

(4) एकशिंगी असलेला गेंडा – गोवा.

**प्र. 3.**

(1)

| ॲमेझॉन नदीतील जलवाहतूक | गंगा नदीतील जलवाहतूक |
|---|---|
| (१) ॲमेझॉन नदीतून प्रामुख्याने व्यापारी तत्त्वावर आंतरराष्ट्रीय जलवाहतूक केली जाते. | (१) गंगा नदीतून प्रामुख्याने अंतर्गत जलवाहतूक केली जाते. |
| (२) ॲमेझॉन नदीतून केल्या जाणाऱ्या जलवाहतुकीचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. | (२) गंगा नदीतून केल्या जाणाऱ्या जलवाहतुकीचे प्रमाण तुलनेने कमी आहे. |

(2)


| भारतातील नागरीकरण | ब्राझीलमधील नागरीकरण |
|---|---|
| (१) भारतात तुलनेने कमी नागरीकरण झाल्याचे आढळते. | (१) ब्राझीलमध्ये तुलनेने जास्त नागरीकरण झाल्याचे आढळते. |
| (२) २०११ च्या आकडेवारीनुसार भारतातील नागरीकरणाचे प्रमाण केवळ ३१.२ टक्के होते. | (२) २०११ च्या आकडेवारीनुसार ब्राझीलमधील नागरीकरणाचे प्रमाण सुमारे ८४.६ टक्के होते. |
| (३) भारतातील उत्तर भागात तुलनेने कमी व दक्षिणेकडील भागात तुलनेने अधिक नागरीकरण झाल्याचे आढळते. | (३) ब्राझीलमधील उत्तर भागात तुलनेने कमी व दक्षिणेकडील आणि आग्नेयेकडील भागात तुलनेने अधिक नागरीकरण झाल्याचे आढळते. |
| (४) गोवा हे भारतातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. | (४) सावो पावलो हे ब्राझीलमधील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. |

(**टीप :** *वरीलपैकी कोणतेही दोन मुद्दे लिहिणे अपेक्षित.*)

(3)

| भारताची पश्चिम किनारपट्टी | भारताची पूर्व किनारपट्टी |
|---|---|
| (१) भारताची पश्चिम किनारपट्टी अरबी समुद्राला लागून आहे. | (१) भारताची पूर्व किनारपट्टी बंगालच्या उपसागराला लागून आहे. |
| (२) भारताच्या पश्चिम किनारपट्टीच्या प्रदेशात नद्यांच्या मुखाशी खाड्या आढळतात. | (२) भारताच्या पूर्व किनारपट्टीच्या प्रदेशात नद्यांच्या मुखाशी त्रिभुज प्रदेश आढळतात. |

**प्र. 4. (अ)**




**प्र. 4. (आ)**

(1) वरील नकाशा भारतातील राष्ट्रीय महामार्ग व प्रमुख बंदरे दर्शवतो.

(2) उत्तर-दक्षिण महामार्ग श्रीनगर आणि कन्याकुमारी या दोन शहरांना जोडला आहे.

(3) गुजरातमधील दोन बंदरांची नावे : (i) कांडला (ii) पोरबंदर.

(4) मुंबई-मंगळुरू राष्ट्रीय महामार्ग दरम्यान असलेली दोन ठिकाणे : (i) रत्नागिरी (ii) कारवार.

(5) मुंबई-नागपूर राष्ट्रीय महामार्ग दरम्यान असलेली दोन ठिकाणे : (i) नाशिक (ii) अमरावती.

**प्र. 5.**

**(1)** (१) उत्तर भारतीय मैदानी प्रदेश हा सखल प्रदेश आहे. या प्रदेशात लोकसंख्येचे दाट वितरण आढळते.

(२) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात शेती व विविध उद्योग भरभराटीस आले आहेत.

(३) या प्रदेशात वस्तूंची ने-आण करण्यासाठी व प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वाहतुकीच्या साधनांची मागणी असते. म्हणून, उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात लोहमार्गांचे जाळे विकसित झालेले आहे.

**(2)** (१) मॅनॉस शहराचे स्थान विषुववृत्ताजवळ आहे.

(२) या शहरात जवळजवळ वर्षभर सूर्यकिरणे लंबरूप पडतात.

(३) परिणामी, मॅनॉस शहराच्या वार्षिक किमान तापमानात व कमाल तापमानात विशेष बदल होत नाही. म्हणून, मॅनॉस शहराच्या तापमानकक्षेत वर्षभरात खूप मोठा बदल होत नाही.

**(3)** (१) हिमालयातील बहुतांश नद्या अतिउंचावरील बर्फाच्छादित पर्वतशिखरांमधून उगम पावतात.

(२) उन्हाळ्यात बर्फ वितळल्यामुळे उन्हाळ्यातही या नद्यांना पाणी मिळते.


(३) पावसाळा, हिवाळा व उन्हाळा या तिन्ही ऋतूंत पाणीपुरवठा होत असल्यामुळे हिमालयातील जवळजवळ सर्व नद्या बारमाही स्वरूपाच्या आहेत.

**(4)** (१) ब्राझीलचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ८५,१५,७७० चौरस किमी आहे. याउलट भारताचे एकूण क्षेत्रफळ केवळ सुमारे ३२,८७,२६३ चौरस किमी आहे.

(२) ब्राझीलची लोकसंख्या केवळ सुमारे २० कोटी आहे. याउलट, भारताची लोकसंख्या सुमारे १३० कोटी आहे.

(३) म्हणजेच, भारताच्या तुलनेत ब्राझीलचे क्षेत्रफळ जास्त व लोकसंख्या कमी आहे. त्यामुळे, ब्राझीलमधील दरडोई जमीन धारणा भारताच्या तुलनेत जास्त आहे.

**प्र. 6. (अ)**




(1) २०१० साली भारताचे सरासरी आयुर्मान ६७ वर्षे आहे.

(2) दोन्ही देशांमधील सरासरी आयुर्मानातील वाढ १९९०-२००० या दशकात समान आहे.

(3) या कालावधीत ब्राझीलचे सरासरी आयुर्मान भारतापेक्षा अधिक आहे. ब्राझील तसेच भारताचे सरासरी आयुर्मान वाढत आहे. वैद्यकीय क्षेत्रात होणारी प्रगती व राहणीमानातील सुधारणा याला कारणीभूत आहेत.

**प्र. 6. (आ)**

(1) २००९ व २०१२ या वर्षी भारताने ब्राझीलकडून आयात केलेले मूल्य ब्राझीलला केलेल्या निर्यात मूल्यापेक्षा अधिक होते.

(2) २०१३ या वर्षी भारताचे ब्राझीलशी झालेले व्यापार संतुलन सर्वांत अनुकूल होते.

(3) २०१२ या वर्षी ब्राझीलकडून आयात केलेले मूल्य ५००० दशलक्ष डॉलरपेक्षा अधिक होते.

(4) २००८ या वर्षी ब्राझीलकडून आयात केलेले मूल्य सर्वांत कमी होते.

(5) २०१४ या वर्षी ब्राझीलला निर्यात केलेले मूल्य सर्वांत अधिक होते.

(6) २०१३ या वर्षी भरताच्या ब्राझीलशी संबधित निर्यातमूल्यातील व आयातमूल्यातील तफावत सर्वाधिक होती. ही तफावत शिलकीचे (अनुकूल) व्यापारी संतुलन निर्देशित करणारी होती.

**प्र. 7.**

**(1)** भारतीय वन्य प्राण्यांचे संरक्षण व वनसंवर्धनासाठी पुढील उपाययोजना उपयुक्त आहेत :

**(अ) वन्य प्राण्यांचे संरक्षण :** (१) वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी त्यांचे अधिवास नष्ट होण्यापासून रोखणे.

(२) देशातील राष्ट्रीय उद्यानांची व अभयारण्यांची संख्या वाढवणे.

(३) वन्य प्राण्यांच्या तस्करीवर व शिकारीवर कायदेशीर निर्बंध घालणे.

(४) वन्य प्राण्यांच्या जिवास धोका निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कडक कायदेशीर कारवाई करणे.

**(ब) वनसंवर्धन :** (१) वनसंवर्धनासाठी वृक्षारोपणाचे उपक्रम राबवणे.

(२) लोकांमध्ये वनसंवर्धनाविषयी जागरूकता वाढवणे.

(३) शेतजमिनीसाठी वनक्षेत्राच्या वापरावर आळा घालणे.

(४) खाणकामासाठी वनक्षेत्राच्या वापरावर निर्बंध घालणे.

**(2)** साखर कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली :

(१) या कारखान्याची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

(२) कारखान्यात आणखी कोणकोणत्या वस्तूंचे उत्पादन होते?

(३) कारखान्यात कार्यरत असणाऱ्या कामगारांची एकूण संख्या किती?

(४) कारखान्यातील वस्तूंच्या उत्पादनासाठी कोणत्या कच्च्या मालाची आवश्यकता असते?

(५) कारखान्यातील वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल कोणत्या ठिकाणाहून आणला जातो?

(६) कारखान्यात उत्पादित झालेला पक्का माल कोणत्या ठिकाणी विक्रीस पाठवला जातो?

(७) कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणती खबरदारी घेतली जाते?

(८) पर्यावरणास हानी होऊ नये, यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात?

**(3)** (१) भारतात सुमारे दीड शतके ब्रिटिशांची राजवट होती.

(२) १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाले.

(३) स्वातंत्र्यप्राप्तीपासून, म्हणजेच १९४७ पासून भारतीय संघराज्याने संसदीय प्रजासत्ताक शासनप्रणालीचा अवलंब केला आहे.

(४) स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या वीस वर्षांत भारताला तीन युद्धांना व अनेक प्रांतांतील दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागले.

(५) विविध स्वरूपांच्या समस्या असूनही भारत हा जगातील एक प्रमुख विकसनशील देश आहे.

(६) भारत आज एक प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखला जातो.

(७) विविध टप्प्यांवर झालेल्या आर्थिक सुधारणांमुळे भारताच्या आर्थिक विकासास वेग आला आहे.

(८) भारतातील लोकसंख्येत कार्यशील गटातील लोकांचे (तरुणाईचे) प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे भारताकडे एक 'तरुण देश' म्हणून पाहिले जाते.